# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ : २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web : ropune.org.in

परीपत्रक

जा.क्र : तंशिविकापु/विवि/एनबीए/२०१८/4229

दिनांक :

30 SEP 2018

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्था,

विषय : संस्थेच्या **एन बी ए** बाबतची सद्यस्थिती कळविण्याबाबत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/आढावाबैठक/२०१८/१७६ दिनांक १९/०९/२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन संचालनालयाचे संदर्भिय पत्रास अनुसरुन संचालनालयात दिनांक ०४/१०/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत संस्थांच्या एन बी ए बाबतच्या सद्यस्थितीचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे.

तरी आपण आपल्या संस्थेच्या एन बी ए बाबतची सद्यस्थिती खाली दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन या कार्यालयाचे ई-मेल आयडीवर info.ropune@gmail.com **दिनांक ०१/१०/२०१८** रोजी **सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** कळवावी.

info.ropune@gmail.com **प्रपत्र**

| अभ्यासक्रम अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एचएमसीटी | संस्थेचा डीटीई कोड | शासकीय/अशासकीय अनुदानित/अशासकीय विनाअनुदानित | एनबीए मानांकन प्राप्त झाले असल्यास तपशील | एनबीए मानांकन प्राप्त झाले नसल्यास अर्ज केला आहे काय? त्याबाबतची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| | | | | प्राप्त झालेले आहे/ अर्ज केला आहे |
| | | | | |

सोबत : संचालनालयाचे संदर्भिय पत्र.

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

# तंत्र शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०२३३४७६, २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


बैठकीची सूचना

बैठक दिनांक : ४.१०.२०१८

क्रमांक : १६/आस्था/आढावा बैठक/२०१८/१७६

दिनांक : 19 SEP 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

संचालक,

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

मुंबई.

विषय : विभागीय सहसंचालक आढावा बैठक.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयातील, विभागीय सहसचालकांची आढावा बैठक **दिनांक ४.१०.२०१८ रोजी सकाळी ११.३०** वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व मा. उपसचिव, तंत्र शिक्षण हे सुध्दा उपस्थित राहणार आहेत.

सदर आढावा बैठकीबाबतची विषयसूची खालील प्रमाणे देण्यात येत आहे. सदर विषयसूचीत नमूद मुद्दाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाशी संबधित मुद्दाबाबतची माहिती / अभिप्रायात्मक टिप्पणी बैठकीच्या वेळी सादर करावी

**बैठकीची विषयसूची :**

१. दिनांक ५.१२.२०१७ रोजी संचालनालयात आयोजित करण्यांत आलेल्या आढावा बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयांशी संबंधित मुद्यांबाबतचा अनुपालन अहवाल.

२. न्यायालयीन प्रकरणे / अवमान याचिका याबाबतची वर्षनिहाय / न्यायालय निहाय प्रकरणांची सद्यस्थिती (MAT/Hon. High Court/Hon. Supreme Court/ Affidavit Submitted/ not submitted) संचालनालयाकडून / शासनाकडून आवश्यक असलेल्या आदेश/ सुचना याबाबतची प्रकरणनिहाय माहिती.

३. विभागातील अनुदानित संस्थांच्या मूल्यनिर्धारणाची कार्यवाही व सद्यःस्थिती.

४. वृक्ष लागवड उपक्रमांअतर्गत आपल्या विभागाच्या स्तरावर करण्यात आलेली कार्यवाही.

५. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमीत आराखडा तयार करणेचे अनुषगाने साजरी करण्याच्या अनुषंगाने विभागीय स्तरावरील कार्यवाहीची माहिती

\\192.168.1.9\minister_ppt\desk16\2018\2018.Adhava Baithak.doc

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

21 SEP 2018

आवक क्र. 8620

६. विभागातील संस्थाबाबतची प्रवेशाची सद्यस्थिती, त्या अनुषंगिक आवश्यक [illegible] नसलेल्या शिक्षकांचे इतर संस्था मध्ये करावयाचा समावेशनाबाबतचा प्रस्ताव.

७. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने बाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सन २०१७-१८ मध्ये वितरीत अनुदानाच्या वाटपाबाबतच्या सद्यस्थिती, DBT Portal वर भरण्यात आलेल्या माहितीबाबत विहीत प्रपत्रातील माहिती. DBT Portal बाबत pilot व non pilot संस्थांना येणा-या अडचणींबाबतची टिप्पणी व कार्यवाही.

८. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेबाबतची व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून मा. जिल्हाधिकारी यांच अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीच्या बैठकांबाबत व कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती.

९. विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय संस्थांमधील सन २०१८-१९ मध्ये देण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या बांधकामाचा तपशील.

१०. सहसंचालकांनी त्यांच्या विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय संस्थांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल.

११. मा. महालेखापाल, यांचेकडील लेखा परीक्षण आक्षेप व भांडार पडताळणी आक्षेप तसेच संचालनालयाच्या स्तरावरून करण्यांत आलेल्या अंतर्गत लेखा परीक्षणातील आक्षेपाचे निपटा-याबाबतची सद्यःस्थिती.

१२. विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थांच्या N.B.A. बाबत सद्यस्थिती.

१३. Online Roster बाबत विभागीय कार्यालय स्तरावर कार्यवाही व त्या अनुषंगाने रिक्तपदे भरण्याबाबची सद्यस्थिती

१४. शै.वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या ऑन लाईन व ऑफ लाईन प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रिया संदर्भात आलेल्या अडचणी, प्रक्रियेत जाणविलेल्या उणिवा व त्याबाबत करावयाची उपाययोजना

१५. सुविधा केंद्र / प्रवेश निश्चिती केंद्र यांना आलेल्या अडचणी तसेच सुविधा केंद्रे / प्रवेश निश्चिती केंद्रे यातील अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून झालेल्या चुकांमुळे उद्‌भवलेली प्रकरणे व त्यांचे स्वरूप, ते टाळण्यासाठी भविष्यात करावयाचे बदल.

१६. प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी, त्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण करण्यासाठी केलेली कार्यवाही.

१७. प्रवेशप्रक्रियेविषयक झालेली न्यायालयीन प्रकरणे व त्यानुसार प्रक्रियेतील सुधारणांना असलेला वाव.

१८. शै.वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या एमएचटी सीईटी २०१८ या प्रवेश परीक्षेच्या अनुषंगाने जिल्हा संपर्क अधिकारी व विभागीय कार्यालय यांना देण्यात आलेल्या अग्रीमाच्या अनुषंगाने झालेला खर्च मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे सादर करावयाच्या हिशोबाबतची सद्यःस्थिती.

१९. शै.वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया विहीत मुदतीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करण्याबाबत वेळापत्रकाची आखणी व कार्यवाही करण्याबाबतची सद्यस्थिती.

२०. तंत्र शिक्षणाची गुणवत्ता वाढ करण्याबाबतच्या उपक्रमांचा आढावा.

- उद्योगधंदे समन्वय बैठकीच्या अनुषंगाने विभागीय स्तरावरील ॲक्शन टेकन रिपोर्ट.

- विविध उद्योगधंद्यांच्या संघटनांशी करण्यांत आलेले करार, Incubation centre व Start up ह्या उपक्रमाबाबतची सद्यस्थिती तसेच त्या अनुषंगाने केलेले प्रयत्न.
- संस्था स्तरावर Industry सोबत केलेल्या MOU बाबतची माहिती खालील प्रपत्रात स्वतंत्रपणे (Soft Copy) सहित सादर करावी.

| अ.क्र | संस्थेचे नांव | सामजस्य करार केलेल्या Industry नांव | MOU चा दिनांक | MOU बाबतचा विषय व संक्षिप्त माहिती | MOU चे अनुषंगाने झालेली कार्यवाही - | MOU चे outcome / Beneficiaries |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |

- शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाबाबत विभाग निहाय प्रस्ताव व त्या अनुषंगाने केलेले प्रयत्न.
- CEP अंतर्गत राबविण्यांत येणा-या प्रशिक्षण कार्यक्रमांचा विभागनिहाय आढावा.
- पदवी व पदविकाधारकांना उद्योगधंद्यामधून प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी करण्यांत आलेले प्रयत्न.
- संस्थांमध्ये संशोधन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न व प्रोत्साहनपर योजनांची विभागनिहाय माहिती.
- तंत्र शिक्षण संचालनालयाच्या News Letter साठी विभागातील कार्यक्रमाची माहिती.

आपल्या विभागातील शासन स्तरावर प्रलंबीत असलेल्या विषयाबाबतची माहिती सुध्दा स्वतंत्रपणे सोबत आणावी. तसेच सदर बैठकीस आपण स्वतः संपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर विषय सूचीमध्ये आपल्या कार्यासनाशी संबंधित मुद्दाबाबत आपली सविस्तर वस्तूस्थिती दर्शक टिप्पणी दिनांक १.१०.२०१८ पुर्वी मा. संचालकाच्या अवलोकनार्थ श्रीम. पेडणेकर, कार्यासन क्रमांक-१ यांच्याकडे सादर करावी.